दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे मो.नं. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार १६ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २७१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मराठा आरक्षण, बँकेच्या कर्जा बद्दल चिठ्ठी लिहून तरुणाची आत्महत्या !



प्रतिनिधी । माजलगाव दि.१५: मराठा आरक्षण मिळत नसल्याने व बँकेकडून कर्ज वसुलीसाठी सतत तगादा लावत असल्याने एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी (दि.१५) सकाळी छत्रपती संभाजीनगर येथे उघडकीस आली. दत्ता कालिदास महिपाल (वय ३२ रा. शिंदेवाडी ता. माजलगाव) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. महिपाल याने मराठा आरक्षण आंदोलन काळात शहरातील संभाजी चौक येथे पाच दिवस आमरण उपोषण केले होते. आरक्षणाचे आंदोलन संपल्यानंतर तो नोकरीनिमित्त संभाजीनगर येथे स्थायिक झाला होता. आमरण उपोषण करूनही मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तर शहरातील गोपाळ अर्बन बँकेतून एक लाख रुपयाचे कर्ज घेतले होते हे कर्जाचा हप्ता न भरल्याने बँकेचे कर्मचारी सतत फोन लावून करून तगादा लावत होते. मोदी, माल्या कर्ज घेऊन पळून जातात पण शेतकऱ्यांनाच सर्वजण त्रास देतात दत्ताने त्याचा लहान भाऊ महेश याच्या व्हॉटसअॅपवर पाठविलेल्या चिठ्ठीत, 'आय लव यू ब्रद्रर अॅण्ड ऑल' तसेच मी काही कारणावरुन फाशी घेत आहे. माजलगाव येथील गोपाला अर्बन या बँकेकडून मी १ लाख रुपये कर्ज घेतले होते. पण काही हप्ते न भरल्याने बँकेकडून रोज फोन येत असल्याने मी खुप त्रस्त झालो होतो. मोठ्या बिझनेसवाले कर्ज घेतात व न भरता पळून जातात, विजय माल्या असेल किंवा निरव मोदी असेल त्यांना कुणी काही बोलत नाही. पण शेतकऱ्यांनाच सर्व बोलतात. दूसरे कारण मराठा आरक्षण मिळत नाही. कारण काय आहे, मी उपोषण करुन काय फायदा झाला नाही, सरकारने याची भरपाई करावी, स्वॉरी मम्मी-पप्पा सुखी रहा, तुमचा दत्ता, असा मजकूर सुसाइड नोटमध्ये आढळून आला. याचा ताण घेऊन त्याने विजय मल्ल्या, निरव मोदी यांच्या सारखे मोठे लोकं कर्ज बुडवतात परंतु शेतकऱ्यांच्या मुलाने कर्ज घेतले तर त्याला त्रास देतात अशी चिठ्ठी लिहून भावाच्या मोबाईलवर टाकली व मंगळवारी रात्री संभाजीनगर येथे गळफास लावून आत्महत्या केली. बुधवारी सकाळी त्याच्या भावाने मोबाईल पाहिला, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. याबाबत वाळूज पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे. शवविच्छेदनानंतर त्यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. बुधवारी रात्री त्याचेवर शिंदेवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## संभाजी पाटील यांची डी.जी.राठोड फौंडेशनच्या समाजरत्न पुरस्कारासाठी निवड



**वादळवार्ता/कुडूत्री**

तरसंबळे (ता.राधानगरी) येथील संभाजी बापू पाटील यांची सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल डी.जी. राठोड फाउंडेशन वतीने राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कारासाठी (२०२४) निवड करण्यात आली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. पाटील हे सध्या इचलकरंजी येथे वास्तव्य करत असून महाराष्ट्र पोलीस मित्रचे जिल्हाध्यक्ष आहेत. तर रोटरी क्लब (हातकणंगले) सचिव पदावरती कार्यरत आहेत. त्यांनी सामाजिक शैक्षणिक,आरोग्य,कला,क्रीडा, आदी क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिले असून अनेक उल्लेखनीय उपक्रम राबविले आहेत. याआधी त्यांच्या कार्यासाठी विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## सुरज शेख याचे बारावी सीबीएससीत यश.

**उरण/विठ्ठल ममताबादे**



सुरज नूरा शेख मु.जासई.याने सीबीएससी बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. तो टी.एस. रहमान, न्हावे.या विद्यालयात शिकत होता, कोणताही क्लास न लावता त्याने ८० % गुण प्राप्त केले आहेत. सुरज चे पालक नूरा हसन शेख हे रयत शिक्षण संस्थेत शिक्षक असून ते रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक आणि दी रयत सेवक को ऑपरेटिव्ह बँक, सातारा चे मा.व्हॉईस चेअरमन आहेत,सुरजने या यशाचे श्रेय आपले आई वडील आणि शिक्षकांना दिले आहे. त्यास पुढे कॉम्पुटर सायन्स या फिल्ड मध्ये उच्च शिक्षण घ्यायाचे आहे.त्याच्या या यशाचे अभिनंदन श्री.छ.शिवाजी हायस्कूल चे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर मा.अरुण घाग, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, रयत सेवक को ऑपरेटिव बँक साताराचे स्वीकृत संचालक आणि गुरुकुल प्रमुख संतोष ठाकरे यांनी केले असून त्याचे ग्रामस्थ,नातेवाईक व सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## नाशिक मध्ये राजकारण पेटले, भाजपच्या नेत्याने शिवसेना ( ठाकरे गट) प्रचार कार्यालयावर केला हल्ला

**नाशिक/सुरेश इंगळे** नाशिक मध्ये प्रचार सीगेला पोहोचला असतानाच या निवडणुकीच्या प्रचारात महाविकास आघाडी (एम व्ही ए )आणि महायुतीमध्ये चांगलाच संघर्ष पाहायला मिळत आहे. सोमवारी सिडकोमध्ये प्रचार फेरी दरम्यान भाजपच्या नेत्याने शिवसेना ठाकरे गटाच्या प्रचार कार्यालयावर हल्ला केला. महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांची प्रचार फेरी प्रचार करत करत सिडको मधील शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचार कार्यालयासमोरून जात असताना वादग्रस्त नगरसेवक मुकेश सहाने हे राजाभाऊ वाजे यांच्या प्रचार कार्यालयात घुसले, व त्यांनी कार्यकर्त्यांना दमबाजी देत पक्षाचे चिन्ह असलेली मशाल तोडून फेकली. त्यामुळे दोन्ही गटांमध्ये चांगलाच वाद निर्माण झाला. प्रसंगान्वे नेत्यांनी मध्यस्थी केली, त्यामुळे थोडक्यात मिटले. तरीही दोन्ही गटात अजूनही तणावाची परिस्थिती आहे. याप्रकरणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी अंबड पोलीस ठाण्यात सहाने विरोधात तक्रार केली . शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यासमोर जमल्याने अखेर पोलिसांनी भाजपचे माजी नगरसेवक मुकेश सहाने यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. ही बाब भाजपच्या कार्यकर्त्यांना कळताच तेही मोठ्या संख्येने अंबड पोलीस स्टेशन समोर जमले व जोरदार घोषणाबाजी करीत पोलीस निरीक्षकांना धारेवर धरले. त्या दबावामुळे भाजप कार्यकर्त्या अर्चना दिंडोरकर आणि सोनाली ठाकरे यांच्या तक्रारीवरून शिवसेनेचे (ठा. गट) जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे .आता नाशिकमध्ये शेवटच्या टप्प्यावर मतदान आले असून राज्यभरातील अनेक नेते नाशिक दौऱ्यावर आहेत, त्यामुळे होणारे मेळावे, सभा आणि प्रचार फेऱ्या यातून शिवसेना (ठा. गट) आणि शिंदे गट यांच्यात चांगलीच जुंपली आहे. आता प्रचार हातघाई वर गेल्याने पोलिसात गुन्हे दाखल होऊ लागले आहेत. त्यामुळे नाशिकच्या निवडणुकीत परिस्थिती तणावग्रस्त बघण्यास मिळत आहे.

## नायगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मुंडे यांनी दिले एका मुंगसास जीवदान...!

**नायगाव/रामप्रसाद चन्नावार**

नायगांव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारोती श्रीराम मुंडे हे दिनांक 14 मे रोजी गडगा परिसरामध्ये पेट्रोलिंग करत असतानां एका आज्ञात वाहाने वन्यप्राणी मुंगुस यास धडक देऊन जखमी केले होते व रोडवर बेहोश अवस्थेत पडले होते अशा परिस्थिमध्ये स्वतः वनप्राणी मुंगुस याला हिमतीने उचलूस घेऊन तत्काळ लघु पशु वैद्यकीय दवाखाना नायगाव येथे उपचारासाठी आनले असता येथील डॉ सुधाकर साळवे यांनी तात्काळ उपचार केले तेव्हा मुंगुस होश मध्ये आले व वनपरिक्षेत्र अधिकारी निखील हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी एम.डी गुरुपवार व वनसेवक राजकुमार भालेराव यांना संपर्क करून त्यांच्या स्वाधीन केले व सदरील वन्यप्राणी मुंणुस वनपरिक्षेत्राच्या जंगलामध्ये सोडून देण्यात आले एका मुक्या प्राण्या वर कर्तव्य दक्ष पो.नि. मारोती मुंडे. डॉ सुधाकर साळवे. एम.डी. गुरुपवार. राजकुमार भालेराव. यांनी मुंगसास जीवदान दिले.त्याबदल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## अंबाजोगाई येथील संगीन मस्जिद इनामी जमीन भू माफियांच्या घशात ! वफ्फ बोर्ड नावालाच; तत्काळ चौकशी करण्याची वर्षाताई जगदाळे यांची मागणी

**अंबाजोगाई/परवेज पटेल** अंबाजोगाई येथील वक्फ बोर्डाच्या अधिकार क्षेत्रात असलेली संगीन मस्जिदी शेकडो एकर जमीन भु माफियांनी प्लॉटिंग करून विक्री करण्याचा सपाटा लावला आहे. जिल्ह्यातील वक्फ बोर्डचे अधिकारी झोपा काढत आहेत का? असा खडा सवाल उपस्थित करत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्याकडे अंबाजोगाई येथील संगीन मजिद इनामी जमीन विक्री प्रकरणी चौकशी करून संबंधित वफ बोर्डाचे अधिकारी व भूमाफिया विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना महिला आघाडी राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी इरामी जमिनीवर अबैध कब्जा करत प्लॉटिंग करून विक्री करण्याचे प्रकरणे बाढले आहे. दर्गा मस्जिद, मंदिर बासारख्या धार्मिक क्षेत्रातील जमिनीवर कब्जा करत करोडो रुपयांची कमाई भूमाफिया करत आहेत. या गंभीर बाबीकडे संबंधित बरफ बोर्ड किया मंदिर प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने असे प्रकार वादले आहे. अंबाजोगाई येथील संगीन मजिद प्रकरणातही भूमाफियांनी शेकडो एकर जमिनीवर प्लॉटिंग करत ती विक्री करण्याचा सपाटा लावला आहे. या गंभीर बाचीकडे प्रशासना सहित वक्फ बोर्डच्या अधिकान्यांचे साफ दुर्लक्ष होताना दिसत आहे. वक्फ अधिका-यांच्या संगनमताने पॉटिंग करून इनामी जमीन विक्री होत आहे का? इनामी जमिनीवर कब्जा करण्याचे प्रकरण बाढ़त असताना संबंधित अधिकारी शांत कसे. अंचाजोगाई येथील इनामी जमीन विक्री प्रकरणात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्याकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी तक्रार केली असून संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. कारवाई झाल्यास लोकशाही मागनि आंदोलन करण्याचा इशारा वर्षाताई जगदाळे यांच्याकडून देण्यात आला आहे

संपादकीय

## जीवनाची खरी मजा

खरं तर जीवनाची मजा हा मोबाईल, व्हॉट्सअॅप इंस्टाग्राम ,यूट्यूब,फेसबुक येण्याआधीच होती. मित्रांच्यात गप्पागोष्टी व्हायच्या. एकमेकांना रोजची रोज भेटल्या शिवाय करमत नसायचं. टिंगल,टवाळी दंगा,मस्ती आता गेलिया हरवून . अन् ते मित्रही. संवाद होतोय फोनवर,तो ही निर्जीव मनान. फक्त समाधान होतय फोनवर बोलण्याचं. तसं प्रत्यक्षात भेटण्यात, बोलण्यात,जो लाईव्ह आनंद असतो ना ! तो याच्यातून मिळत नाही. दंगा मस्ती करत,एकमेकांना वाकुल्या दाखवत, हिनवत,चेष्टा तर कधी कुचेष्टा करत, एकमेकावर फिश पॉइंट टाकत, धांगडधिंगा करत, एकमेकांची उडवा उडवी करत, जो एन्जॉय असतो ना... तो या मोबाईल मधून मिळत नाही. ना तो व्यक्तही करता येत. कधी कधी मित्रांच्या अडीअडचणी सामोपचाराने सोडवल्या जायच्या. ते आता मोबाईलवर नाही सोडवता येत! कारण मोबाईल मध्ये खोटं बोलायला जमत. तसं प्रत्यक्षात एकमेकांच्या सहवासात असताना भेटीगाठी होत असतात. त्यामुळे खोटं बोलणं फारसं होत नसायचं. प्रत्यक्षात ते अनुभव घेतलेत आम्ही. अन् मोबाईल आल्या पासून चांगली माणसं सुद्धा खोटं बोलायला लागली. माणूस असतो एके ठिकाणी आणि सांगतो.मी दुसऱ्या ठिकाणी आहे म्हणून. प्रत्यक्षात या माध्यमाने जग जवळ आलं असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात तर ते उलट लांब गेल आहे. असं म्हणावं लागेल. तसे फोनच्या माध्यमातून संवाद होत असतात. पण प्रत्यक्षात भेटीगाठी आता दुर्मिळ होऊ लागल्या आहे. म्हणून जीवनाची खरी मजा जी पूर्वी होती.ती आता या मोबाईलच्या जमान्यात फारशी राहिली नाही. याची खंत वाटत राहते.

. ?©®पांडुरंग म्हस्के?

# नवयुवकांच्या व्यथा

आज महाराष्ट्रात बघितले तर अठरा पगड जातीचे लोक राहतात. या महाराष्ट्राची लोकसंख्या दिवसागणिक वाढत आहे. परंतु, त्या तुलनेत आज लोकांना रोजगाराच्या संधी कमीच उपलब्ध होताना दिसत आहेत. त्याच लोकांमध्ये सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन गटात वर्गीकरण पूर्वीपासून झालेले आपण बघतो. आजच्या घडीला मात्र पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना सुशिक्षित असून बेरोजगारीला सामोरे जाणे भाग पडते आहे. या सगळ्यात युवकांची संख्या अधिक प्रमाणावर आहे. शिवाय जे आधीपासूनच कारखान्यात काम करणारे कामगार, विट भट्टीवर विटा वाहून नेणारे कामगार, घरे बांधण्यासाठी काम करणारे मजदुर जे भर उन्हातान्हात घाम गाळून कष्ट करत असतात त्यांना मिळणारा भत्ता वाढताना कधी दिसत नाही. ते पूर्वीही आठ हजार पंधरा हजार पगारावर काम करत होते आजही ते तेवढ्याच पगारावर काम करताना दिसत आहे. तहान भुकेची पर्वा न करता हे कामगार महिन्याच्या मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारावर आपल्या मुलामुलींचे शिक्षण करतात, घर चालवतात स्वतःची भूक मारून मुलांची पोटे भरतात. आपल्याच घराचे काम करणारे कामगार किंवा घराला रंग मारण्यासाठी आलेला कारकून यांना कधी आपल्यातील एक भाकरीचा तुकडा किंवा एक ग्लास पाणी देण्याचे पुण्य आपल्याकडून करवले जात नाही. एवढ्याशा पगारात ते त्यांचे घर कसे चालवत असतील? हा ही प्रश्न कधी आपल्या मनाला भेडसावत नाही.

दुसरीकडे स्थिती आहे मॅकेनिकल इंजिनिअर, सिव्हील इंजिनिअर, फार्मसी, एम बी ए, एम टेक, एम एस सी असे कितीतरी पदवी उत्तीर्ण होऊन वर्षाला हजारो विद्यार्थी नोकरी मिळवण्यासाठी बाहेर पडत असतात. परंतु, मुलांचे चांगले शिक्षण असूनही त्यांना त्यांच्या शिक्षणाच्या ऐपतीप्रमाणे पगार मिळत नाही. चांगले चांगले शिक्षण घेऊन चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होऊन कंपन्यांचे कितीही इंटरव्ह्यू दिले तरी पाहिजे तशी नोकरी मिळत नाही. आणि नोकरी मिळाली तरी पाहिजे तसे वेतन मिळत नाही. आजच्या घडीला सी ए, एम बी ए, केलेले विद्यार्थी सुद्धा गेल्या चार पाच वर्षांपासून दहा बारा हजार पगारावर बाहेर अकाउंटंट, असिस्टंट म्हणून काम करत आहे. त्या दहा बारा हजार पगारासाठी न परवडणारे गाडीचे पेट्रोल, भाडे खर्च करून वीस पंचवीस किलोमीटर रोजचा प्रवास करत आहेत. फ्रेशर्स असेल तरी तीच गत आहे आणि अनुभव असला तरी तीच गत आहे. आजच्या घडीला मिळणाऱ्या कमी पगारामुळे मुलांना लग्नाला मुली मिळणे अवघड होत चालले आहे. त्यात मुलींच्या मुलांकडून असणाऱ्या अपेक्षा ही सर्रास वाढताना दिसत आहे. किती दिवस हे काळचक्र असेच सुरू राहणार कोणास ठाऊक?

आजच्या काळात शिक्षणाला महत्त्व राहिलेलेच नाही. विद्यार्थी कितीही शिकून नोकरीसाठी चांगल्या कंपनीत गेला तरीही त्याला मिळणारी पहिली नोकरी ही खालच्या दर्जाची आणि कमी पगाराचीच मिळते. पुढे येणाऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी आज महाराष्ट्रातील प्रत्येक युवक मिळेल ते काम करण्यास तयार आहे. तरीही त्या कामाचा मोबदला त्या युवकाच्या खिशाला न परवडणारा च आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्वीचे कामाचे स्वरूप, कामाचे तास १२ तासांवरून ८ तासांवर आणले, आठवड्याची एक सुट्टी सक्तीची, नोकरदारांना पी एफ मिळवून दिला हे जरी खरे असले तरी ते फक्तं सरकारी नोकरीत लागू आहे. खाजगी नोकरीत बघायला गेलं तर तीच परिस्थिती आज आपल्याला बघावयास मिळते. मोठ्या मोठ्या एम एन सी कंपन्यामध्ये आवड्याच्या सुट्टीची दिरंगाई असते. विद्यार्थ्यांना १२ ते १५ तास रात्रीच्या सत्रात नोकरी करावी लागत आहे. आणि त्याच १२ ते १५ तासांच्या कामासाठी त्यांना मिळणारा मोबदला हा फक्तं १० ते १५ हजार असतो. जर महाराष्ट्रात असणारी परिस्थिती अशी आहे तर सुशिक्षित आणि अशिक्षित लोकांमध्ये फरक तो काय? बाहेर कारखान्यातील कामगार, विट भट्टीत काम करणारे कामगार यांची जी परिस्थिती आहे तीच परिस्थिती आज चांगले शिक्षण घेऊन पुढे येणाऱ्या युवकांची झालेली आहे.

समाजात आपण बघतो मुलांकडे एम बी ए, सी ए, फार्मसी, एम टेक, अशा चांगल्या चांगल्या पदव्या असतात पण तरीही ते विद्यार्थी कुठेतरी किराणा दुकानात, डी मार्ट, सिटी सेंटर मॉल, अशा ठिकाणी मिळेल त्या पगारावर मिळेल ते काम करण्यास केवळ चांगल्या कंपनीत नोकरी मिळत नाही म्हणून रुजू झालेले असतात. जर चांगले शिक्षण घेऊनही नोकरी मिळण्यासाठी अशी अवस्था असेल तर महागडे शिक्षण घेतल्याचा उपयोग तरी काय? आज नक्की चांगल्या पगाराची नोकरी मिळवण्यासाठी नक्की गरज कशाची तेच समजेनासे झाले आहे. कारण नोकरीसाठी मुलाखतीला गेल्यानंतर शिक्षण काय हे कोणी विचारण्याच्या सर्वात आधी पहिला प्रश्न हाच असतो या आधी कुठे काम केले आहे का? किंवा तुम्हाला कामाचा अनुभव किती? मग जर असे असेल तर महाराष्ट्रातील युवकांनी का उगाच आई वडिलांचा पैसा घालवून १०-१५ वर्षे शिक्षणात खर्च करायची? त्यापेक्षा कुठेतरी काम करून अनुभव मिळवणे चांगले नाही का? लग्नाला स्थळ बघताना सुद्धा मुलीकडचे आधी कमवतो किती? महिन्याचे उत्पन्न किती हे विचारतात त्यावरून त्या संबंधित मुलाचे शिक्षण ठरवतात. मग शिक्षणाला महत्त्व आहे की नाही हा गंभीर प्रश्न उपस्थित होतो.

आज महाराष्ट्रातील बहुतांश प्रश्न सोडवले जात आहेत. कुठेतरी महाराष्ट्राचा विकास होताना दिसतो आहे, परंतु या सगळ्यात बेरोजगारीचा तसेच उच्च शिक्षित तरुणांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्याचा प्रश्न सोडवण्यास कोणीही पुढे सरसावताना दिसत नाही. आजचा तरुण या काळचक्रात अक्षरशः भरडला जातो आहे. हे कोणाला दिसत नाही. सरकारी नोकरीत संधी आहे असे सगळे म्हणतात. अभ्यास केला तरी परीक्षा पास होऊन सरकारी नोकरीत निवड होते असं सगळेच म्हणतात पण त्या सरकारी नोकरीकडे फिरणाऱ्या तरुणांची संख्या त्यातील वाढलेली स्पर्धा कोणाला दिसत नाही. या एवढ्या मोठ्या स्पर्धेत महाराष्ट्रातील तमाम युवक मंडळींचा कसा काय निभाव लागायचा? आजच्या घडीला महाराष्ट्र सरकार बरेच प्रश्न मार्गी लावताना दिसत आहे परंतु, तरुणांच्या व्यथेकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे. आणि म्हणूनच आज मतदानाचा हक्क बजावणारा तरुण वर्ग कमी दिसत आहे. हे महाराष्ट्र सरकार आज प्रत्येक ठिकाणी स्त्रियांना आरक्षण द्यायला तयार आहे. मुलींसाठी, वयोवृद्धांसाठी आरक्षण देण्यास सक्षम आहे. लहान मुलांसाठी नवीन योजना आणण्यास सक्षम आहे. पण तरुणांचं काय? जर तरुणांच्या मागण्या पूर्ण होऊ शकत नसतील, तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न वर्षानुवर्ष सुटत नसेल तर कोणत्या तोंडाने आजच्या तरुणांनी मतदानाचा हक्क मिळवायचा. कोणाला मत द्यायचे? कोणत्या पक्षाला मत द्यायचे? आणि आमचे तरुणांचे प्रश्न कोण मार्गी लावण्यास हातभार लावेल हे आता येणारा काळच ठरवेल.

**लेखन : नयन धारणकर, नाशिक 8275838083**

# आता धर्माच्या आधारावर बजेटचे वाटप; वोटबँकेसाठी काँग्रेसचे लांगुलचालन, मोदींनी सोडले टीकास्त्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर घणाघात केला. "ही प्रभू रामाची धरती आहे. त्यामुळे गंभीर विचार इथे उपस्थित केला पाहिजे. देशातील सरकारे जेवढा बजेट तयार करते. त्यातील १५ टक्के खर्च फक्त मायनॉरिटीवर केला जात आहे. म्हणजे धर्माच्या आधारे बजेटचं वाटप केलं. धर्माच्या आधारे त्यांनी देशाचे तुकडे केले. आताही धर्माच्या आधारावर बजेटचं वाटप करत आहे. धर्माच्या आधारे बजेटच्या वितरणाला मंजुरी दिली होती." अशी गंभीर टीका त्यांनी काँग्रेसवर केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साधला काँग्रेसवर निशाणा; म्हणाले

विरोधी बाकड्यावर पण नसेल स्थान"बजेटचे असे तुकडे करणे हे किती खतरनाक आहे. तुम्ही जाणताच आहात की काँग्रेससाठी मायनॉरिटी फक्त एकच आहे. त्यांची ती प्रिय व्होटबँक आहे. मी मुख्यमंत्री असताना जेव्हा काँग्रेसने ही गोष्ट उचलली होती. तेव्हा मी मुख्यमंत्री म्हणून त्याला विरोध केला होता. काँग्रेसला तेव्हा



देशातील सर्व बजेटमधील 15 टक्के फक्त मुसलमानांवर खर्च व्हावा, असं काँग्रेसला वाटत होतं. पण भाजपच्या विरोधामुळे ते शक्य झालं नाही." असा दावा पंतप्रधानांनी केला. पण आता जुन्या अजेंड्याला लागू करण्यासाठी काँग्रेसचा प्रयत्न सुरु असल्याचा आरोप मोदींनी केला.

तुमच्या संपत्तीत वाटेकरी

बाबासाहेब धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यास विरोधात होते. पण काँग्रेसला एससी, एसटी, आणि ओबीसींचं आरक्षण काढून ते मुसलमानांना द्यायचं आहे, असा आरोप मोंदींनी काँग्रेसवर केला. तुमची संपत्ती जप्त करून त्यातील हिस्सा मुस्लिमांना देण्याची त्यांची तयारी आहे. लक्षात ठेवा, मोदी धर्माच्या आधारे बजेटचं वाटप होऊ देणार नाही आणि धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. मी चौकीदारवंचितांचा जो अधिकार आहे, मोदी त्याचा चौकीदार आहे. आम्ही तर शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने काम करणारे लोक आहोत. ही निवडणूक केवळ खासदार निवडायची नाही. तर पंतप्रधान निवडायची. बलशाली भारत करण्यासाठी कठोर निर्णय घेणारा पंतप्रधान हवा. कोरोनाचं संकट आलं. आपण त्याचा मुकाबला केला आणि त्यात आपण जिंकलो, असे पंतप्रधान म्हणाले.

# टँकरने पाणी पुरवठाबाबत अडचणी आल्यास संपर्क क्रमांकावर तक्रार करावी

बीड, दि. 15 :- सद्यस्थितीत बीड जिल्हयामध्ये पर्जन्यमान कमी पडल्यामुळे अत्यल्प पाणी साठा असल्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात नसल्यामुळे जिल्हयातील ब-याच गावांमध्ये भिषण पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. ज्या गावामध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली त्या गावाचे प्रस्तावास मंजूरी देवून ग्रामस्थांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तेव्हा ज्या गावामध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली आहे अशा गावामध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो परंतु गावामधील ग्रामस्थांना त्यांच्या गावामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याबाबत माहिती होत नाही. ग्रामीण भागामध्ये टँकरने पाणी पुरवठा केल्यास संबंधित गुत्तेदार हा कमी खेपा होतात त्यामुळे ग्रामस्थांना आवश्यक तेवढे पाणी मिळत नाही परिणामी ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. ग्रामस्थांना पिण्याचे पाण्याचे टँकर गावामध्ये प्रशासनामार्फत देण्यात आले किंवा कसे तसेच टँकरने पाण्याच्या खेपा कमी होत असल्याबाबत त्या अनुषंगाने ग्रामस्थांच्या तक्रारी असल्याबाबत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई बीड यांचे व्हॉटसॲप क्रमांक 7276325896 व 8668381415 वर तक्रारी नोंद करणे.जेणे करुन टंचाईग्रस्त असलेल्या गावामधील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होणार नाही.

## नरेंद्र मोदींना पाहिलं की मला:; एकनाथ शिंदे यांनी कोणती कविता म्हटली ?

**वादळवार्ता/नेकनुर**

कल्याणचे महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे आणि भिवंडीचे महायुतीचे उमेदवार कपिल पाटील यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा झाली. या सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबोधित केलं. या भाषणाच्या सुरवातीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक कविता म्हटली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बघून प्रसिद्ध कवी हरिवंश राय बच्चन यांची कविता आठवते. तू न थकेगा कभी, तू न रुकेगा कभी, तू न मुड़ेगा कभी, कर शपथ, कर शपथ, कर शपथ, अग्निपथ अग्निपथ अग्निपथ, असं एकनाथ शिंदे म्हणाले. नरेंद्र मोदी यांच्या कामाचं कौतुक नरेंद्र मोदी कल्याणमध्ये आल्याने माहौल तयार झालाय. आपण जिंकल्यात जमा आहे. कपिल पाटील आणि श्रीकांत शिंदे विजयाची हॅट्रीक करणार आहेत. डॉ. श्रीकांत शिंदेना मत म्हणजे मोदींना मत... भरकटलेले विरोधी पक्ष मोदींच्या नावानं शिव्या शाप देत आहेत. पण एक अकेला मोदी कितनों को भारी पडत आहे. एक



बार कह दिया तो कह दिया... या देशात राम मंदिर बांधणार म्हणाले, त्यांनी ते पूर्ण केलं, असंही एकनाथ शिंदे म्हणालेत.ते स्वप्न पूर्ण करणारच- शिंदे नरेंद्र मोदींनी देशाला महासत्ता करण्याचं स्वप्न पाहिलंय. ते स्वप्न नरेंद्र मोदी पूर्ण करणार म्हणजे करणार. देश कसा पुढे न्यायचा यांचं व्हिजन ते मांडतात. काम करणारे भारताला नवी दिशा देणारे नरेंद्र मोदी.. भ्रष्टाचाराचा खात्मा करणारे नरेंद्र मोदी. देशातील एकशे चाळीस कोटी जनतेला आपलं कुटुंब मांडणारे नरेंद्र मोदी. विकासासोबत पाकिस्तानला धडा शिकवणारे नरेंद्र मोदी, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी नरेंद्र मोदी यांच्या कामाचं कौतुक केलं आहे.

## नरेंद्र मोदींचं भाषण सुरु असताना भर सभेतून मुख्यमंत्री शिंदे का उठून गेले?

पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र दोऱ्यावर आहेत. नाशिकमधील सभा आटोपल्यानंतर मोदी यांची मुंबईतील कल्याणमध्ये सभा झाली. या सभेमध्ये बोलताना मोदींनी काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मोदी यांचं भाषण संपण्याआधीच निघून गेले. मी इथे पाहतो तुम्ही पुढे जा, असं मोदी एकनाथ शिंदे यांना म्हणाले. मात्र नेमकं काय घडलं आणि एकनाथ शिंदे कुठे गेले जाणून घ्या. म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उठून गेले!

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आज महाराष्ट्र दौरा असून त्यांची नाशिक आणि कल्याणमध्ये सभा होणार होती. त्यानंतर मुंबईमध्ये अशोक सिल्क मिल ते हवेली ब्रीज असा रोड शो होणार आहे. नाशिकमधील सभा आटपून मोदी कल्याणमध्ये आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं भाषण झाल्यावर पंतप्रधानांनी भाषणाला सुरुवात केली. भाषण सुरू असताना शिंदे उठले आणि स्टेज सोडून जाऊ लागले. नेमकं काय झालं कोणालाच काही समजलं नाही, त्यानंतर मोदींनीच सांगितलं.काय म्हणाले मोदी?मुंबईमधील एका कार्यक्रमामध्ये मला जायचं आहे. तिथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही येणार आहेत. त्यामुळे तिथे पोहोचण्यासाठी शिंदे यांना मध्यातूनच निघावं लागणार आहे, असं सांगत तुम्ही जा मी इथे सांभाळतो असं मोदी शिंदे यांना म्हणाले. त्यावेळी मोदीsss मोदी अशा घोषणा दिल्या. मोदींचा आज मुंबईत रोड शो होणार असल्यामुळे आर्थिक राजधानीमध्ये मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नरेंद्र मोदी काँग्रेसवर बरसलेजे लोक ज्यांनी पिढ्या न पिढ्या गरिबी हटाव खोटे नारे दिली आणि प्रत्येक निवडणुकीत अफिम गोळीचा हार, नेहरूंपासून 2014 निवडणुकी पर्यंत गरिबीचा आफिम माळ जपायचे. हाच यांचा खेळ चालायचं. ज्यांनी भ्रष्टचार शिष्टाचार बनवला होता. काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विकासाच्या बजेट मध्ये छेद दिला, फाळणी विचार केला. बजेट हिंदू बजेट आणि मुस्लिम बजेट हा विचार त्यांनी केला. काँग्रेस 15 टक्के बजेट मुसलमानांसाठी मंजूर करावे अशी त्यांची इच्छा.

## लिंबागणेश येथे झोटींगबाबा यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील मौजे. लिंबागणेश येथे आज दि.१२ रविवार रोजी "झोटींग बाबा यांची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यंदा यात्रेचे १० वे वर्षं असुन माळरानावर जांभळीच्या झाडाखाली असलेल्या झोटींगबाबा यांचे शेतकऱ्यांना पशुधनाबद्दल विशेष महत्त्व असुन पोळ्याच्या दिवशी पंचक्रोशीतील पशुपालन याठिकाणी नारळ फोडुन नैवेद्य दाखवण्यासाठी आवर्जून येतात.ढवळे नाईगडे,घोलप,वाणी,जाधव, थोरात यांची देवस्थान ठिकाणी शेती असणा-या प्रमुखांसह ईतर भाविकांनी गेल्या वर्षी ४ लाख रुपये लोकवर्गणीतून मंदिर बांधले. आज यात्रेनिमित्त आराध्यांच्या गोंधळ कार्यक्रमासह महाप्रसादाची पंगत घालण्यात आली शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारचे नैवेद्य दाखविण्यात आले.भाविकांनी घरून आणलेल्या भाकरी व त्याठिकाणी केलेल्या भाजीचा महाप्रसादाचे भाविकांनी सेवन केले.



## नरेंद्र मोदी भरकटत चाललेत, दहा वर्षांच्या कार्यकाळात:; रोहित पवारांचा थेट निशाणा

नाशिकमध्ये नरेंद्र मोदी यांची सभा झाली. या सभेवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवारांनी टीका केली आहे. नरेंद्र मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांचं इथं भलं झाल्याचं आपण पाहिलाय का? शेतमालाला भाव नाही, बेरोजगारीचं प्रमाण वाढलंय. महिला सुरक्षेचा प्रश्न देशात मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. 2014 मध्ये मोदींनी सांगितलेले एकही गोष्ट त्यांनी दहा वर्षात पूर्ण केली नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर बोलण्यापेक्षा मोदींनी शेतकऱ्यांसाठी काय केलं हे बोलायला हवं होतं, असं रोहित पवार म्हणाले."नरेंद्र मोदी भरकटलेत"शरद पवारांच्या एका मुलाखतीतील विधानानंतर मित्र पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील का?, अशी चर्चा सुरु झाली आहे. यावर रोहित पवारांनी भाष्य केलंय. या निवडणुकीत भाजप आणि मित्र पक्षांची अतिशय वाईट परिस्थिती होईल, याची नरेंद्र मोदींना भीती वाटतेय. सर्व्हेमध्ये भाजपची पीछेहाट होतानाच दिसतेय. सामान्य कुटुंबांना भाजपने अडचणीत आणलं, असं रोहित पवारांनी म्हटलं.नरेंद्र मोदींच्या भाषणाची सुरवात विकासावर केली. नंतर हिंदू मुस्लिमांवर आले. नंतर भटकती आत्म्यावर आले. नंतर अदानी अंबानीवर आले. आता शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना ते आमच्याकडे या असं सांगतायत. नरेंद्र मोदी भरकटत चाललेत. आणि सामान्य लोकांच्या हिताचे मुद्दे त्यांच्या भाषणातून बाजूला पडतायेत, असं रोहित पवार म्हणाले.नरेंद्र मोदी आम्हाला नकली म्हणतात. पण नकली कोण आणि असली कोण हे चार तारखेनंतर आपल्याला कळेल. असली लोक हे मतदार आहेत आणि ते असले लोकांच्याच पाठीमागे आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीलाच भरघोस यश मिळेल, असा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला.मोदींच्या सभेवर टीकानरेंद्र मोदींच्या पिंपळगावच्या सभेत धुळे आणि अहमदनगरहून लोकं आणली गेली होती. मतदार कमी आणि कार्यकर्ते काही प्रमाणात अशी परिस्थिती मोदींच्या सभेला होती. मोदींच्या आजच्या सभेत कुठेही उत्साह नव्हता. मोदींनी देखील भाषण आवरते घेत तिथून काढता पाय घेतला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोदींच्या सभेत बंदी केली असेल. तर मोदींचा आणि भाजपचा विश्वास मतदारांवर देखील राहिलेला नाहीये. त्यांना फक्त शो बाजी करायची होती.

## अंबाजोगाईत नवऱ्याच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या,,,!

**(अंबाजोगाई प्रतिनिधी)**

व्यसनाधीन मल्हारी काशिनाथ शिंदे वय 35 वर्ष राहणार चनई तालुका अंबाजोगाई या नवऱ्याच्या सततच्या जाचाला कंटाळून शितल मल्हारी शिंदे वय 23 वर्ष या विवाहितेने आपल्या राहत्या घरी आपले जीवन संपविल्याने तिच्या वडिलांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून शहर पोलिसांनी ताबडतोब सूत्रे हलवून आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत मल्हारी काशिनाथ शिंदे वय वर्ष 35 व्यवसाय ऊसतोड कामगार याचे 2018 रोजी पहिले लग्न झाले असताना शितलशी दुसरे लग्न केले व काही दिवस चांगले राहिले असताना शितलच्या आई-वडिलांना त्याचे दुसरे लग्न झाल्याचे समजले त्यावेळी शितल कडची माणसं व मल्हारी काशिनाथ शिंदे काही माणसे बैठक घेऊन आम्ही चांगले सांभाळतो असे समज काढले व काही दिवस चांगला राहिला म्हणून तर त्याने चारित्र्याच्या संशयावरून नेहमी दारू पिऊन मारहाण करू लागला ऊस तोडीची उचल घेऊन दारूत खर्चून टाकू लागला व शेवटी शेवटी तर तुमची मुलगी मी नोंदवत नाही तुमची मुलगी घेऊन जा आणि मला दीड लाख रुपये द्या असे म्हणून शितलच्या घरच्यांना व शीतलला दगादा लावला व शितलला मारण्याची धमकी दिली परत त्याने खोटे बोलून दारू पिणार नाही तुमच्या मुलीला चांगले सांभाळतो म्हणून परत शितल ला घेऊन गेला शेवटी दिनांक 14 मे रोजी माझा मुलगा गोविंद यांच्या मोबाईलवर चनई येथून शितलीचे धीर संजय काशिनाथ शिंदे यांनी फोन केला की तुमच्या मुलीने शितलने गळफास घेतला आहे पहिले लग्न जावयाने लपवल्याने व दारू पिऊन सततच्या पती मल्हारी काशिनाथ शिंदे राहणार सनई याच्या त्रासाला जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याने तिच्या मरणास तिचा पती जबाबदार आहे अशा प्रकारे शितलच्या वडिलांनी फिर्यादीत म्हटले आहे आरोपीला अंबाजोगाईतूनच काही तासातच पोलीस निरीक्षक विनोद घोळवे यांनी सूत्र हलवून आरोपीला ताब्यात घेतली आहे





# बीड नगर राज्य महामार्गावरील खड्डा बनला अपघात अड्डा तक्रार करुनही सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

(आष्टी प्रतिनिधी) बीड नगर राज्य महामार्गावरील घाटापिंपरी येथे रस्त्यावर मधोमध पडलेला खड्डा हा अपघाताचा अड्डा बनला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रार करून देखील कसलीच दखल घेतली जात नसल्याने या खड्ड्यात पडून एखाद्याचा बळी गेला तर सबंधित विभागावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनहित लोकशाही पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यानी केली आहे. बीड नगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील घाटा येथे गेल्या अनेक महिन्यांपासून एक खड्डा पडला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करून देखील तो बुजवला जात नाही.तो खड्डा बुजविण्यात यावा यासाठी जनहित लोकशाही पार्टीच्या वतीने गांधीगिरी करून बेशरमाचे झाड लावण्यात आले होते. तरी देखील याकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत आहे. दररोज एका ना एका गाडीचा इथे अपघात होत आहे. दुचाकीवरून पडल्याने अनेक जण जखमी होऊन वाहनाचे नुकसान झाले आहे.एखाद्याचा बळी गेल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार का?असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. जर या खड्ड्यात पडून एखादी दुर्दैवी घटना घडली तर संबंधित विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनहित लोकशाही पार्टी बीड जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यांनी केली आहे.



## अभिजीत राणे फाउंडेशन तर्फे माझी आई विषयावर राज्यस्तरीय कविता स्पर्धा

आई सारखे दैवत या जगामध्ये नाही, स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी. प्रत्येकाला आपली आई प्रिय असते.आपल्या आईवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी अभिजित राणे युथ फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने माझी आई या विषयावर राज्यस्तरीय कविता स्पर्धा आयोजित करण्यात आली असून १० वर्षांवरील कोणताही स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकतो.स्पर्धकाने सुवाच्च अक्षरात स्वलिखित किमान १२ ओळी आणि जास्तीत जास्त २० ओळीत आपली कविता स्पीड पोस्ट किंवा कुरिअर द्वारे स्पर्धा प्रमुख गणेश हिरवे २/१२ पार्वती निवास रामनगर वांद्रेकरवाडी जोगेश्वरी पूर्व मुंबई ४०००६० या ठिकाणी १० जून २०२४ पर्यंत पोहचतील अशा रीतीने पाठविणे आवश्यक आहे.कोणतीही कविता ऑनलाईन स्वीकारली जाणार नाही.परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे २००१/- १५०१/- १००१ /- रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येईल.सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल

## पुस्तक मैत्रीने ग्रामीण भागात साहित्यिक चळवळ वृद्धिंगत केली - युवा बालसाहित्यिक सचिन बेंडभर पाटील यांचे प्रतिपादन

ता. 15 पुणे प्रतिनिधी महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा बालसाहित्यिक सचिन बेंडभर पाटील यांनी पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथील सौ. मयुरी भवारी व डॉ. हनुमंत भवारी यांच्या पुस्तक मैत्री बुक गॅलरीला अचानक भेट दिली. पुस्तक मैत्री बुक गॅलरीने ग्रामीण भागात मोठी साहित्यिक चळवळ वृद्धिंगत केली असल्याचे मत यावेळी बेंडभर पाटील यांनी बोलताना व्यक्त केले. यावेळी लेखक व समीक्षक प्रा. कुंडलिक कदम, लेखिका मीनाक्षी पाटोळे यावेळी उपस्थित होते.

यावेळी बेंडभर पाटील यांनी बुक गॅलरी करण्यामागे पार्श्वभूमी व तिचे कामकाज समजून घेतल्यानंतर ते पुढे म्हणाले, वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा भवारी दांपत्याचा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. सध्या वाचन




संस्कृती लोप पावत असताना मोबाईल, कॉम्प्युटर या डिजिटल युगात बुक गॅलरीचा विषय म्हणजे खडतर आव्हानच..! पण मुळातच साहित्य क्षेत्रात वावरत असणाऱ्या लेखक हनुमंत भवारी यांनी हे अवजड आव्हान लीलया पेलले आहे. आपल्या पत्नीच्या आग्रहाखातर त्यांनी बुक गॅलरी सुरू करून मराठी संस्कृती जोपासण्याचा व वाचन चळवळ अधिक वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला आहे, ही गोष्ट साहित्य चळवळीतील योगदानात नक्कीच दखलपात्र आहे. नफ्याचा जास्त विचार न करता केवळ वाचनाची आवड जोपासणाऱ्या या दाम्पत्याचे करावे तेवढे कौतुक कमी आहे.

ग्रामीण भागात साहित्य चळवळ विकसित होत आहे, ही खरोखरच आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. महाराष्ट्र दिन, मराठी राजभाषा भाषा दिन, जागतिक पुस्तक दिन, वाचन प्रेरणा दिन हे दिवस साजरा करताना केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता वाचन चळवळीत भवारी दांपत्यासारखे योगदान प्रत्येक मराठी माणसाने लावले तर संस्कृतीची जोपासना होईलच, शिवाय एक नवी सक्षम व सुसंस्कृत पिढी तयार होईल हे निश्चित..!

## परिचारिका दिवस उत्साहात साजरा

प्राधिकरण, निगडी-(प्रतिनिधी) लोकसभा निवडणुकीमुळे परिचारिका दिवस दिनांक १५ मे रोजी प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ आणि मधुमेह रूग्ण संघ तर्फे परिचारिका दिवस दादा दादी उद्यानातील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. भगवान महाजन, मधुमेह संघाचे डॉ. दिगंबर इंगोले मंचावर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.डी वाय कॉलेज ऑफ नर्सिंगच्या डॉक्टर खुर्शिद जमादार या होत्या. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत गीत सौ.शोभना जोशी यांनी म्हटले.




पाहुण्यांचा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. परिचय सय्यद मैडम (कार्याध्यक्ष) यांनी करून दिला. अध्यक्षांच्या मनोगता नंतर परिचारिकांचा सत्कार सौ आशा नष्टे यांनी जेष्ठ नागरिक संघास दिलेल्या पंचवीस हजार रुपये देणगीच्या व्याजातून भेट वस्तू देऊन करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. ज्योती इंगोले यांनी केले.आभार श्री सुभाष जोशी (उपाध्यक्ष) यांनी मानले. यावेळी मा.चंद्रश्खर जोशी,आनंदराव मुळुक यांच्या सह सर्व संघांचे अध्यक्ष, सदस्य व कार्यकारणी सदस्य हजर होते.संघाच्या प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली . संघाच्या सदस्य असणाऱ्याआशा नष्टे,शोभना जोशी, पुष्पांजली सूर्यवंशी,पुष्पा लंके,विभावरी कोटस्थाने, सविता साठे,वत्सला वाघचौरे, क्षिरसागर, माधुरी डिसोजा या ज्येष्ठ परिचारिकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या समारोप सोहळ्यास उत्सुर्त प्रतिसाद !

नुकताच मुलुंड येथे रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई. च्या अंतर्गत “समाज कल्याण समिती व विभाग समिती क्र.१० (विक्रोळी ते मुलुंड)” यांच्या वतीने संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती समारोप सोहळ्यानिमित्त संघाध्याक्ष मा श्री मयुरजी देवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.संत रोहिदास प्रवचनकार श्री महादेव शेगावकर गुरुजी यांच्या भक्तीमय वातावरणात कार्यक्रमाला सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करून, प्रवचनकार महादेव शेगावकर गुरुजी यांनी संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या अमृतवाणी ऐकविले. गीतकार विलास देवळेकर व संगीतकार एकनाथ धयाळकर आणि गायिका रुतिका संजय मुरुडकर यांनी संत रोहिदास आरतीने भक्तिमय वातावरण निर्माण झाले.प्रयोग कलाविष्कार आणि स्वरांगण ऑर्केस्ट्रा यांच्या संयुक्त विद्यमाने गीतकार बाळासाहेब थोरात व विलास देवळेकर, गायिका रुतिका संजय मुरुडकर व सौ कोमल संतोष धयाळकर आणि गायक आणि संगीतकार एकनाथ धयाळकर यांनी संगीतबद्ध संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या भक्ती गीतांचे अल्बम मधील काही गीते सादर केलीत. पदाधिकारी व विश्वस्त आणि कलाकार यांचा “शाल व स्मृतिचिन्ह आणि संत रोहिदास चांदीची प्रतिमा” देऊन सत्कार करण्यात आले. तसेच ह्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौ पुजा अभय काळे यांनी केले.

# पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे याने तब्बल १ कोटीची लाच मागितल्याचा प्रकार उघडकीस

## ३० लाख रुपये स्विकारताना एसीबीच्या पथकाने एका खासगी इसमाला अटक केले

बीड दि.15 (प्रतिनिधी): बीड जिल्ह्यात गाजलेल्या जिजाऊ मल्टिस्टेट घोटाळ्यात एका व्यक्तीला आरोपी न करण्यासाठी आणि तपासात मदत करण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेचा वादग्रस्त पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे याने तब्बल 1 कोटीची लाच मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. यातील 30 लाख रुपये स्विकारताना एसीबीच्या पथकाने एका खासगी इसमाला अटक केले आहे. या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेतील अनेक कर्मचारी अडकत असल्याचे चित्र आहे. या प्रकाराने सर्वत्र खळबळ माजली आहे. बीड जिल्हा पोलीस दलात लाचखोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यातच आर्थिक गुन्हे शाखा तर पैसे कमविण्याचे कुरण झाल्याची चर्चा यापूर्वी अनेकदा होती. जिल्ह्यात मागच्या काही काळात मल्टीस्टेटचे अनेक घोटाळे समोर आले. त्यात आर्थिक गुन्हे शाखेची भुमिका कायम संशयास्पद राहिली. त्यातच आता ‘जिजाऊ मल्टीस्टेट’च्या प्रकरणात एका व्यक्तीला आरोपी न करण्यासाठी व तपासात सहकार्य करण्यासाठी तब्बल 1 कोटी रुपयांच्या लाचेची मागणी आर्थिक गुन्हे शाखेचा पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे याने केल्याची तक्रार एसीबीकडे आली होती. एसीबीच्या पथकाने लाचेच्या मागणीची खात्री केल्यानंतर सापळा रचला. या प्रकरणात पहिला टप्पा म्हणून 10 लाख रुपये अगोदरच स्विकारण्यात आले होते. उर्वरित रक्कमेपैकी 30 लाख रुपये एका खासगी व्यक्तीकडे देण्याचा निरोप पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे याने फिर्यादीला दिला होता. त्यानुसार बीडच्या सुभाष रोडवरील एका कापडदुकानात हे 30 लाख रुपये स्विकारताना एसीबीचे पोलीस उपअधिक्षक शंकर शिंदे व त्यांच्या पथकाने अटक केली. आर्थिक गुन्हा शाखेचा पोलीस निरीक्षक असलेल्या हरिभाऊ खाडेची कारकिर्द मागच्या काही काळात वादग्रस्त राहिलेली आहे. विशेषत: देवस्थान जमीन प्रकरण आणि मल्टिस्टेटच्या घोटाळा प्रकरणात आरोपींनाच सहकार्य होईल अशी भुमिका हरिभाऊ खाडेकडून वठविली गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. ‘जिजाऊ मल्टिस्टेट’ प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे होता मात्र या काळात प्रमुख आरोपीला अटक करण्यात आर्थिक गुन्हे शाखेला यश आले नाही. जिजाऊ सोबतच इतरही काही मल्टिस्टेटच्या प्रकरणात हरिभाऊ खाडे चक्क मल्टिस्टेट चालकांसोबतच असल्याचे चित्र आहे. गेवराई मधील एका मल्टिस्टेटच्या संदर्भाने दाखल गुन्ह्यात आरोपी शहरात फिरत असतांनाही आर्थिक गुन्हे शाखेने मात्र आरोपी फरार असल्याचे सांगत दोषारोपपत्र दाखल केले होते. असे अनेक कारनामे आता समोर येवू लागले आहेत. दरम्यान या घटनेनंतर हरिभाऊ खाडेच्या काही ठिकाणच्या मालमत्तांवर देखील छापे मारण्यात आल्याची माहिती आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )